# १८ व १९ व्या शतकातील कायदा आणि लिखाणांच्या माध्यमातून स्त्री सुधारणा चळवळ : एक दृष्टीक्षेप

**डॉ. सुजाता पाटील**, देवचंद कॉलेज, अर्जुन नगर

**प्रस्तावना :** ब्रिटिशांच्या भारतातील आगमनापूर्वी स्त्रियांचे जिवन हे मर्यादित स्वरूपाचे होते. धार्मिक, आर्थिक, राजकीय अशा कोणत्याही क्षेत्रात स्त्रीला स्वातंत्र्य नव्हते. फक्त घर आणि कुटुंब यातच तिचे क्षेत्र मर्यादित होते. तिचे अधिकार क्षेत्र ठराविक मर्यादेपर्यंतच होते. पेशवाईच्या विनाशानंतर ब्रिटीशांच्या आगमनाने भारतावर युरोपीयन संस्कृतीचा प्रभाव पडू लागला. नवी इंग्रजी भाषा व व्यक्ती स्वातंत्र आणि समाजिक न्याय अन्याय या नवविचार व उदारमतवादी विचारसरणींचा प्रभाव निश्‍चितच होवु लागला. स्त्री सुधारणेच्या वातावरणाची निर्मिती होवू लागली. स्त्रीदास्य व स्त्री शिक्षणाचा विचार हळूहळू होवू लागला. सन १८५० ते १८७० मध्ये म्हणावे इतके स्त्री सुधारणा विषयक विचार इतके प्रभावी नव्हते. परराष्ट्रात होणाऱ्या स्त्री चळवळीचा प्रभाव भारतातही होवू लागला. स्त्रियांचे स्वातंत्र्य आणि स्त्रियांना ही समान हक्क यावर स्त्री संदर्भातील कल्पना बदलू लागली. या पार्श्वभूमीवर १८५० ते १९२० च्या कालखंडातील स्त्री विषयक विचार आणि भुमिका या वरील घडणाऱ्या घडामोंडीमुळे या कालखंडातील अभ्यास महत्त्वाचा ठरतो. इतर राज्यातील तुलनेने महाराष्ट्रातील स्त्री सुधारणेचा प्रयत्न अधिक प्रमाणात आढळतो. तो कसा? नेमक्या प्रथा परंपरा कोणत्या? स्त्री सुधारणा व स्त्री मुक्तीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा चळवळीमार्फत सुधारणा घडवून आणण्यासाठी मोठया प्रमाणात सुधारकांनी प्रयत्न केले. लोकहितवादी, बाळशास्त्री जांभेकर, विष्णू शास्त्री पंडीत यांनी विधवा पुनर्विवाहविषयी अनुकूल वातावरण निर्मितीचा प्रयत्न केला. 'दर्पण', व 'प्रभाकर' मधून बाळशास्त्री जांभेकरांनी विधवा विवाहाचे समर्थन केले. (लोकहितवादींनी नाशिकला विधवा पुनर्विवाह मंडळाची स्थापना केली होती) ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी सुरूवातीला १८५० मध्ये विधवा पुनर्विवाहावरील बंदी हटविण्याची मोहिम सुरू केली होती. न्या.रानडे, लोकहितवादी विष्णूशास्त्री पंडीत, डॉ.भांडारकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, इ.सुधारकांनी व त्या काळातील वृत्तपत्रांनी विद्यासागरांनी केलेली विधवा पुनर्विवाह चळवळ चांगलीच उचलून धरली. वयाचा कायदा झाला. स्त्री प्रश्न सोडविण्यास सुधारकांनी संमती वयाच्या कायद्याचा आधार घेतल्याने सुशिक्षित समाजाचे स्त्री सुधारणा कायदा चळवळीकडे लक्ष वेधले गेले.

स्त्री सुधारणा चळवळीमध्ये स्त्री शिक्षणाच्या प्रश्नालाही सुधारकांनी चालना दिली. समाज ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या शाळेत मुलांना पाठविण्यास सहज तयार होत नाही, हे लक्षात येताच खाजगी शिक्षण संस्था स्थापण्यास सुधारकांनी सुरूवात केली. म.फुल्यांनी पुण्यात मुलींसाठी १८४८ मध्ये पहिली शाळा काढली. स्वत:ची पत्नी सावित्रीबाई हिला शिक्षिका म्हणून शिकवून तयार केले. मुलींनी शाळेत यावे म्हणून पालकांची भेट घेवून मन: परिवर्तन करण्याचा प्रयत्नही केला. अस्पृश्यांना शिक्षण मिळावे म्हणून ते जसे धडपडले तसेच स्त्रियांचा दर्जा उंचावण्यसाठी सुध्दा त्यांनी प्रयत्न केले. बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून अडचणीत सापडलेल्या विधवांची बाळंतपणे सुखरूप होण्यासाठी फुले दाम्पत्यांनी प्रयत्न केले. पंढरपूर येथे अनाथ बालक आश्रमांची स्थापना त्यांनी केली. विधवा केशवपनाचे संकट दूर करण्यासाठी नापीतांचा बहिष्कार, विधवा पुनर्विवाह परिषदेची स्थापना अशी कार्ये तत्कालीन कडव्या सनातनी वातावरणात म.फुल्यांनी हाती घेतली. सनातनी हिंदूनी त्याला विरोध केला. समाजाने वाळीतही टाकले. सनातनी हिंदूचा असा रोष ओढावूनही फुल्यांनी अपेक्षित असलेले स्त्री—उत्थानाचे कार्य चालूच ठेवले. फुल्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे असावे असे हंटर कमिशनपुढे मागणी केली. ना.गोखलेंनीही १९११ ते १९१८ पर्यंत सतत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याबाबत दिल्ली विधिमंडळात ठराव मांडला होता. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या प्रसारात महत्त्वाची भुमिका बजावली. विधवा पुनर्विवाह परिषदेची स्थापना केली. अनाथ बालिकाश्रमाची स्थापना केली. भारतातील पहिले महिला विद्यापीठ स्थापन केले, स्वत: बालविधवेशी पुनर्विवाह करून समाजासमोर आदर्श निर्माण केला. विधवा स्त्रियांसाठी वसतीगृह, आश्रम, शाळा यांची पुण्यात

निर्मिती केली. व यासाठीच आपले जीवन वाहिले. मुंबईत बद्रुद्दिन तय्युबजी आणि बेगम जंजीरा यांनी मुलींसाठी शाळा सुरू करण्यात पुढाकार घेतला होता. अशा प्रकारे १९ व्या शतकात स्त्री शिक्षणाद्वारेही स्त्रीसुधारण्याचे कार्य सुधारणावादी संघटनेने हाती घेतले होते. बंगाल मधील ब्राम्हो समाज, मद्रासमधील थियोसॉफिकल सोसायटी, उत्तरेकडील आर्य समाज, मुंबईतील प्रार्थना समाज अशा संघटनांनी स्त्री शिक्षण व सुधारणेचे कार्य हाती घेतले होते. १९ व्या शतकातील विविध संस्था, संघटना, जातीय संस्था, वर्गीय संस्था इ.नी स्त्रियांचे प्रश्न हाताळून स्त्री सुधारणेचा प्रयत्न केला.

**लिखानाच्या माध्यमातून स्त्री सुधारणा चळवळ :** महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाची सुरूवात प्रत्यक्षपणे न होता नियतकालिकांच्या माध्यमातून चर्चेला सुरूवात होवून झाली.समाजात सामाजिक, राजकीय, धार्मिक परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने बाळशास्त्री जांभेकरानी ६ जाने १८३२ रोजी मराठीतील पहिले साप्ताहिक वृत्तपत्र 'दर्पण' सुरू केले आणि ज्ञान प्रसारास प्रारंभ झाला. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे जांभेकर हे उदारमतवादी बनलेले होते, त्यांनी महाराष्ट्रात समाजसुधारणांची बीजे रोवण्यास सुरूवात केली. समाजसुधारणेमध्ये त्यांचा भर पतितपरावर्तन नियतकालीकास प्रारंभ आणि विधवा विवाहाचा पुरस्कार यावर होता. १९ व्या शतकात उघडपणे स्त्रियांवर अन्याय होत होता. त्या विरोधात संपादकीय लेख लिहून, इतरांनाही लिहीण्यास प्रवृत्त करून स्त्रियांच्या प्रश्नावर लहान स्वरूपाचे लेख प्रकाशित होवू लागले. 'दर्पण' मधून स्त्रियांना शिक्षण मिळावे, बालविवाह पध्दत बंद व्हावी, विधवा पुनर्विवाह घडवून आणण्याची परवानगी असावी या सारख्या स्त्री प्रश्नांची चर्चा केली गेली.

या चर्चेच्या आधारे प्रेरीत होवून 'दर्पण' अंकात तेलंग ब्राम्हणाचा लेख, त्यावरील परशूराम क्षेत्रस्य ब्राम्हणाचा अभिप्राय व संपादकिय निवेदन अशा स्वरूपातील दिर्घ लेख प्रसिध्द झाला. हाच लेख निबंध म्हणून 'पुनर्विवाह प्रकरण' नावाने मुंबईत प्रसिध्द झाला. मराठी भाषेतील हा पहिलाच निबंध होता.लोकहितवादींनी आपल्या शतपत्रांच्या माध्यमातून स्त्री प्रश्न हाताळण्याच्या प्रयत्न केला. त्यांचा स्त्री जिवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोन न्यायिक, स्त्रीपुरूष समानतेच्या आधारावर मानवतावादी स्वरूपाचा होता. त्यांनी स्त्री चे समाजातील स्थान स्पष्ट करताना म्हटले की, '' ज्या देशात स्त्रियांचे अधिकार लोक मानत नाहीत. त्या देशात लोकांची स्थिती वाईट असते.'' मराठी ज्ञान प्रसारकाच्या हाती आलेल्या १८० अंकांमध्ये स्त्री समस्येवर लिहीलेल्या लेखांची संख्या ४५ भरते. समाजामध्ये सुधारणेचे वारे आहे, समाजाची स्थिती बदलत आहे, त्याप्रमाणे समाजपरिवर्तन होण्यासाठी जुलै १८५० च्या मराठी ज्ञान प्रसारकात सखाराम दिक्षीत या व्यक्तीने लिहीले आहे की, मुलींच्या शाळा काढणे , त्या उपवर झाल्या कि त्यांच्या लग्नाचा मांड मांडणेबाबतचा पुरस्कार, स्त्रियांस अनिर्वचनीय दु:ख देणारे प्रतिबंध टाकावे इ. सुधारणावादी विचार पसरत चालले आहेत.

म्हणजेच हा काळ केवळ एका विलक्षण चेतनेने भारलेला होता याची प्रचिती येते. 'शिक्षालाभ' या निबंधात (एप्रिल १८५१) हरिकेशवजी म्हणतात, ''पतीसारखेच शिक्षण स्त्रीला असल्यास उभयतांचे सुख आहे. पत्नीशी प्रेमाने वागणे, मुलांना कसे शिकवावे, घर खटले कसे नीट चालवावे, पतीव्रताधर्माने वागून विद्यानंदाचा उपभोग कसा घ्यावा हे शिकलेल्या स्त्रीलाच कळेल ''अशा निबंधांच्या माध्यमातून स्त्रीशिक्षणाने कशी सुधारणा होईल, स्त्री शिक्षणाचा फायदा कुटुंबाला कसा होईल हे विचार समाजात कसेबिंबले जातील हाच प्रयत्न होता असे म्हणता येईल.

'स्त्री शिक्षणविषयक विचार ' (मे १८५१), 'स्त्री शिक्षण विषयक विचार (एप्रिल १८५१)' अशा निबंधात स्त्री शिक्षणाचे महत्व – समर्थन तसेच पुरूषाप्रमाणेच तीही माणूस आहे. याची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

ज्ञान प्रसारकाच्या माध्यमातून स्त्रियांस विद्याभ्यासाची आवश्यकता, स्त्री शिक्षणाची आवश्यकता, विद्यावृध्दी विषयी विचार, स्त्रियांस वागविण्याची पध्दती, एतद्देशीय स्त्रियांची स्थिती, चांगली बायको, स्त्री शिक्षण हे सात निबंध स्त्री शिक्षणाचे महत्व पटवून देणारे आढळतात. परंतु स्त्रियांच्या इतर समस्यांची चर्चा करणारे लेख कमी स्वरूपात आहेत. मात्र या नियतकालिकाने स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला. विधवा विवाह, बालविवाह सारख्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे प्राथमिक कार्यही या मराठी ज्ञानप्रसारकाने केले.बाबा पद्मनजीनी 'स्त्री विद्याभ्यास निबंध' नावाच्या लिहीलेल्या छोटया

पुस्तिकेत वृध्द गृहस्थ आणि सुशिक्षीत तरूण यांच्या संवादातून स्त्री जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन स्पष्ट केला आहे. स्त्री शिक्षणाने कुटूंबातील स्त्री कशी सुधारेल याचे विवेचन केले आहे. स्त्रियांचा ईश्वर व धर्म या व्यवहारातला सहभाग कशा पध्दतीचा असावा हेही स्पष्ट केले आहे.

’यमुना पर्यटन ‘ या कादंबरीतून विधवा जीवनाची व्यथा मांडली आहे. विधवेला व्याभिचाराला कसे बळी पडावे लागते हे स्पष्ट केले आहे. कादंबरीचा नायक विनायकराव मृत्यु पावल्यानंतर त्याची पत्नी यमुना ही केशवपन न करता पतीच्या मित्राकडे जाते. ख्रिस्ती धर्म स्विकारून पुनर्विवाह करते. म्हणजे विधवा जीवन, पुनर्विवाह हा प्रश्न या कादंबरीतून हाताळला गेलाच मात्र ही सुधारणा करताना धर्म आडवा आला तर प्रसंगी धर्मांतर करण्याची तयारीही दर्शविली आहे.आगरकरांनी ’सामाजिक सुधारणा आणि कायदा‘ या लेखातून बालविवाह रूढीवर आणि त्या रूढीचे समर्थन करणाऱ्यावर टिका केली आहे. बाल विवाह आणि त्यापासून होणारे अनर्थ टाळण्यासाठी त्यांनी स्वयंवर पध्दतीचा पुरस्कार करावा असे मत व्यक्त केले आहे. स्त्री जीवनाचा विकास आणि सुधारणा व्हावी यासाठी त्यांनी ’प्रियराधन‘, ’स्वयंवर‘ , ’वल्लभोपासना‘ या लेखातून आपली मते प्रदर्शित केली आहेत.

बालविवाहाचे दुष्परिणाम ’केसरी‘ कारांनी ’अर्थशास्त्र दृष्टया बालविवाहाचा विचार‘ (३ ऑगस्ट १८८१) ’’व्यवहार दृष्टया बालविवाहाचा विचार ‘‘(१० ऑगस्ट १८८१) ’’स्त्रीदास्य विमोचन ‘‘(३१ ऑगस्ट १८८२) या लेखातून स्पष्ट केले आहेत. बाळकृष्ण लक्ष्मणशास्त्री बापट यांनी ’’विधवा विवाह खंडन‘‘ (१८६५) या ग्रंथातून विधवा विवाह प्रत्यक्ष कृतीने व्हावेत असे आवाहन केले आहे. विष्णूशास्त्री पंडीत यांनी विधवा विवाह प्रश्नासाठी ’ब्राम्हणकन्या विवाह विचार‘ हे पुस्तक लिहीले. स्त्रियांना समाजात समानतेचे स्थान मिळावे म्हणून ’स्त्रियांचे विवाह विचार‘ हे पुस्तक लिहीले. नारायण केशव वैद्य यांनी ’गतभर्तृ कारोवन आणि नन्विारणार्थ यथान्याय शास्त्रोक्त साधन‘(मुंबई १८८३) व ’विधवा पुनर्विवाह निषेधकात चष्मा‘(मुंबई १८८६) या पुस्तामार्फत विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला.

म.गो. रानडे यांनी विधवा प्रश्नांसंदर्भात ’टाईम्स ऑफ इंडिया‘ त लेख लिहीले. ’इंदूप्रकाश‘, ’ज्ञानोदय‘ यांच्या पुरवणीद्वारे विधवांची दुखे: मांडली गेली. केशवपन विरोधातही ’दिनबंधू‘ साप्ताहिकामधून लेखमाला सुरू होती. हिंदू विधवेचा छळ केशवपनाच्या मार्गाने होतो असे मुलीच्या पालकांनी खटला केल्यास त्याचा खर्च आपण देऊ अशी जाहिरात ’इंदूप्रकाशा‘ त आली होती. मामा परमानंदानी बॉम्बे गॅझेटमध्ये पत्राद्वारे नवीन विधवेचे केशवपन जो न्हावी करेल त्यास आपल्या घरी येण्यास बंदी करावी असे आवाहन केले होते.

सुधारकांनी अशा प्रकारे स्त्री प्रश्न हाती घेऊन स्त्री सुधारणा चळवळीला चालना दिली. कायद्यांच्या मार्फत सुधारणा घडवून आणण्यासाठीही सुधारकांनी प्रयत्न केले. त्यासाठी ब्रिटीश शासनाला निवेदने सादर केली. सतीबंदीचा कायदा, संमतीवयाचा कायदा, शारदा कायदा, पुनर्विवाह कायदा अशा कायद्यांची निर्मिती केली गेली. सती बंदी कायद्याचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे, या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र म्हणावी इतकी झाली नाही. परंतु समाजावर या कायद्याचे दडपण आले असे म्हणता येईल? या कायद्याबरोबरच केशवपन, स्त्री शिक्षण या चळवळी सुरूच होत्या. लिखानांच्या माध्यमातून सुधारकांनी मोठया प्रमाणात समाजात बदल घडवून आणण्याचे ध्येय तडीस नेण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे कायदा आणि लेखन या साधनांचा वापर समाजसुधारणा व स्त्री सुधारणा घडवून आणण्याचा प्रारंभ १९ व्या शतकात झाला असे म्हणता येईल.

**संदर्भसुची** : १. पाटील शोभा, स्त्रियांची आत्मचरित्रे :स्त्रीवादी शोध, मल्हार प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २००२,पृ.क्र.५७.६१

२. इंगोले कृ.जी. मराठी साहित्यातील विधवा जीवनाचे दर्शन(इ.स.१८१८ ते १९२०), शिवाजी विद्यापीठास —पी.एच.डी. साठी सादर केलेला अप्रकाशित शोध निबंध, ऑगस्ट १९८१ पृ.क्र.८०

३.सहस्त्रबुध्दे पु.ग.(संपा.)लोकहितवादींची शतपत्रे, कॉन्टीनेन्टल प्रकाशन पुणे, पाचवी आवृत्ती १९७०,पत्र क्र.३०,पृ.क्र.२२९

४.भागवत विद्युत महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने ...स्त्री अभ्यास केंद्र समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ पुणे, पृ. क्र. १७ ते २०.